# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०६/०९/२०१९

## दि.०५/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८९८/१९,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | श्रीमती.वर्षा बांबे,पो.उप-निरी. हडपसर पोलीस स्टेशन, पुणे |
| **आरोपी** | सुरेश सुकुमार बरगाळे,वय-४० वर्षे,रा.टिंगरेनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०९/२०१९ रोजी २०/०० वा. एस.ई.झेड बायेटेक सर्व्हिसेस प्रा.लिमी.घुले वस्ती,मांजरी बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे या कपंनीचे कॅन्टीनचे बिल्डींग येथे |
| **तपशिल** | हडपसर पो स्टे अ.मयत रजि.नं.२७९/१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,एस.जे.कॅन्ट्रक्ट प्रा.लिमी.पुणे या कपंनीने एस.ई. झेड बायेटेक सर्व्हिसेस प्रा.लिमी.घुले वस्ती,मांजरी-बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणेया कपंनीचे कॅन्टीन बिल्डींगचे कन्स्ट्रक्शनचे काम घेतले होते. सदर कपंनीचे कॅन्टीनचे बिल्डींगचे काम चालु असताना,त्यांनी साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,सिनीअर इंजिनिअर यांनी स्लॅब बांधणीचे भक्कमपणाची खात्री न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणे कामगारांना स्लॅब भरण्यास सांगुन,कामगार संदिपान दिज पादा महातो,वय-२० वर्षे,रा.लेबर कॅम्प,सिरम कंपनी, मांजरी-बुद्रुक,पुणे,मुळगाव-मु.पो.बिरचाली हान्सला,अर्शा पुरुलिया,पश्चिम बंगाल हा कॅन्टीन बिल्डींग या इमारतीचे स्लॅब भरण्याचे काम करीत असताना,अचानक सदरचा स्लॅब संदिपान दिजपादा महातो याचे अंगावर पडुन,त्यामध्ये तो ढिगा-याखाली सापडुन गंभीर जखमी होऊन मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सह.पो.निरी. पी.एम.लोणारे ९९२३४४४९९८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २९३/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४१ वर्षे,रा.मयुर कॉलनी,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | मोबाईलधारक, ई-मेल आयडीधारक व बॅंकेचा खातेधारक अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/११/२०८ ते दि.१६/०६/२०१९ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे मित्रांना सहकुटुंब दुबई येथील प्रेक्षणीय स्थळे पाहावयास जावयाचे असल्याने,फिर्यादी यांचा दुबई स्थित मित्र याने दुबई टुर्स बाबत विचारपुस केली असता,त्याने दुबई येथील एका टुर्स कंपनीचा मोबाईलनंबर दिला व चौकशी करण्यास सांगितले. त्या प्रमाणे फिर्यादी यांचे त्यांचेसोबत बोलणे झालेनंतर,त्याने दुबई येथील प्रेक्षणीय स्थळांची ॲडव्हान्स बुकींग व वाहतुकीला लागणारा अंदाजे खर्च २,२३,८००/- सांगुन,सदरची रक्कम त्यांचे बॅंकेचे खात्यावर भरण्यास सांगुन,फिर्यादी यांना ठरल्याप्रमाणे कोणतेही बुकींग न करता व पैसे परत न देता,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती.प्रतिभा जोशी ९८५०१४०७६० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४८०/१९,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला-वय-५८ वर्षे,रा.बालाजीनगर,धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/२०१९ रोजी १२/४५ वा.शाहु बँक चौक,धनकवडी, पुणे ते अहिल्यादेवी चौक धनकवडी,पुणेचे दरम्यान कात्रजकडुन हडपसरकडे जाणारे बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया कात्रजकडून हडपसरकडे जाणारे बसने प्रवास करीत असताना,त्यांनी त्यांचे जवळील पर्स मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम ९ हजार रुपये असा एकुण ९९ हजार रू किचा ऐवज,फिर्यादी यांचेसोबत बस मध्ये चढलेल्या तीन अनोळखी महिलांनी बस मधील गर्दीचा फायदा घेऊन,संगनमत करुन,हातचलाखीने पर्सची चेन उघडुन सदरचा ऐवज पर्ससह चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. देव |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**